**सेवांतर्गत पदव्युत्तर अभ्यासक्रम निवडप्रक्रियेमध्ये सेवानुभवाचे गूण मिळवून पात्रता ठरविणेबाबत.....**

**महाराष्ट्र शासन**
**वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग,**
शासन निर्णय क्रमांक : एमईडी-१००९/प्र.क्र.२१०/०९/शिक्षण-२
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांकः- २० मे, २०१०

**वाचा:-१)** अधिसूचना, भारतीय आयुर्विज्ञान परिषद, नवी दिल्ली क्र. एमसीआय. १८(१)/२००९-एमईडी/५१२१०, दि. १७.११.२००९.

**२)** संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचे पत्र क्रमवैआसे/गट-अ/मॅग्मो/मागण्या/कक्ष-२अ /१०, दि.२९.०१.२०१०.

**३)** संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे पत्र क्र. संवैशिवसं/ पीजीएम -सीईटी/इनसर्विस/कोटा/२-अ दि.१५.३.२०१०.

**<u>प्रस्तावना:-</u>** भारतीय आयुर्विज्ञान परिषदेने दि. १७.११.२००९ च्या अधिसुचने अन्वये, पोस्टग्रॅज्युएट रेग्युलेशन २००० मध्ये सुधारणा केल्या आहेत. सदर अधिसुचनेत वैद्यकीय पदव्युत्तर पदवी/पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी घेण्यात येणा-या सामायीक प्रवेश परीक्षेची अंतीम गुणवत्ता यादी तयार करताना, दुर्गम व अतिदुर्गम भागात सेवा करणा-या वैद्यकीय अधिका-यांना, त्यांच्या हया सेवेच्या प्रमाणात गुणाधिक्य देण्याचे निदेशीत करण्यात आले आहे. त्यानुसार, दुर्गम व अतिदुर्गम भागात केलेल्या एक वर्षाच्या सेवेसाठी प्राप्त गुणांच्या १० टक्के याप्रमाणे जास्तीत जास्त, प्राप्त गुणांच्या ३० टक्के गुणांचे अधिक्य संबंधित सेवांतर्गत उमेदवारास देण्यात येईल. भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या सदर निदेशांच्या अनुषंगाने, वैद्यकीय पदव्युत्तर पदवी/पदविका अभ्यासक्रमाच्या सामायीक प्रवेश परीक्षेला बसणा-या/बसलेल्या सेवांतर्गत वैद्यकीय अधिका-यांना गुणाधिक्य देण्याबाबतचा प्रस्ताव संचालक, आरोग्य सेवा, मुंबई आणि संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचेकडून अनुक्रमे संदर्भ क्र.(२) व संदर्भ क्र.(३) अन्वये प्राप्त झाला होता. सदर प्रस्तावानुसार गुणाधिक्य देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय:-</u>** वैद्यकीय पदव्युत्तर पदवी/पदविका अभ्यासक्रमासाठी घेण्यात येणा-या सामायीक प्रवेश परीक्षेची अंतिम गुणवत्ता यादी तयार करताना राज्याच्या दुर्गम, अतिदुर्गम, आदिवासी आणि नक्षलग्रस्त भागात सेवा करणा-या अधिका-यांना त्यांच्या सदर सेवेच्या कालावधीच्या प्रमाणात गुणाधिक्य देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार सदर सेवांतर्गत अधिका-यांनी या भागात केलेल्या सेवेच्या प्रत्येक वर्षासाठी प्राप्त गुणांच्या १० टक्के परंतु जास्तीत जास्त, प्राप्त गुणांच्या ३० टक्केच्या मर्यादेत गुणाधिक्य देण्यात येईल, याबाबतची कार्यपध्दती पुढीलप्रमाणे राहील :-

**<u>कार्यपध्दती:-</u>**

1) सामाईक प्रवेश परीक्षेला बसलेल्या सेवांतर्गत वैद्यकीय अधिका-यांची गुणवत्ता यादी (Merit List) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांना पाठवावी.

२) संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांनी संबंधित सेवांतर्गत वैद्यकीय अधिका-यांची राज्याच्या दुर्गम, अतिदुर्गम, आदिवासी आणि नक्षलग्रस्त भागातील सेवा लक्षात घेवून त्यांना सदर सेवेच्या कालावधीच्या प्रमाणात प्रत्येक वर्षासाठी प्राप्त गुणांच्या १० टक्के परंतु जास्तीत जास्त, प्राप्त गुणांच्या ३० टक्केच्या मर्यादेत गुणाधिक्य द्यावे आणि त्यास अतिरीक्त मुख्य सचिव (सार्वजनिक आरोग्य विभाग) यांची मान्यता घेऊन अंतिम यादी संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांना सादर करावी.

३) संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांनी त्यांनी तयार केलेल्या गुणवत्ता यादीनुसार सेवांतर्गत वैद्यकीय अधिका-यांची वैद्यकीय पदव्युत्तर पदवी/पदविका अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया पार पाडावी व त्याबाबत संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना कळवावे.

४) राज्य शासन / केंद्र शासन / मा.सर्वोच्च न्यायालय अथवा मा. उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता निश्चित करण्यात आलेली कार्यपद्धत अवलंबिण्यात यावी.

५) दि. २४.०१.२०१० रोजी घेण्यात आलेल्या सामाईक प्रवेश परीक्षेमध्ये बसलेल्या सेवांतर्गत वैद्यकीय अधिका-यांना हा शासन निर्णय लागू करण्यात येत असून सन २०१०-११ पासून पुढे अमलांत राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०१००५२११५१४१४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(वि.ला.ढोले )
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.उप मुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. अतिरीक्त मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
संचालक, आरोग्य सेवा, मंबई.
ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ, ग्रंथालय, विधानभवन, मुंबई
अधिष्ठाता, सर्व शासकीय दंत महाविद्यालये

कार्यालयीन सचिव, प्रवेश नियंत्रण समिती / शिक्षण शुल्क समिती, २०५, गव्हर्नमेंट पॉलीटेक्नीक बिल्डींग, ४९, खेरवाडी, अली यावर जंग मार्ग, बांद्रा (पू.) मुंबई-५१.
मा.मंत्री (वै.शि.)/ मा.राज्यमंत्री (वै.शि.)यांचे स्वीय सहायक
मा.मंत्री (सा.आ.वि.)/मा.राज्यमंत्री (सा.आ.वि.) यांचे स्वीय सहायक
निवडनस्ती (शिक्षण-२)